# // प्रेसनोट //

दि. १६/०१/२०२२

## दि. १७/०१/२०२२ रोजीचे लसीकरण सत्र नियोजन

कोविड-१९ महामारीच्या प्रतिबंधासाठी दि. १६ जानेवारी २०२१ पासून संपूर्ण देशात व त्याअनुषंगाने राज्यशासनाच्या आदेशान्वये मिरा भाईंदर कार्यक्षेत्रात टप्पाटप्प्याने कोविड-१९ लसीकरणास सुरुवात झाली असून जगात वाढत असलेले कोविड रुग्ण व आढळून येत असलेल्या ओमायक्रॉन व्हेरिएंटमुळे कोविड-१९ वर्किंग ग्रुप ऑफ नॅशनल टेक्निकल ॲडव्हायझरी ग्रुप ऑफ इम्युनायझेशन (NTAGI) तसेच स्टॅन्डींग टेक्निकल सायन्टीफीक कमिटी (STSC) ऑफ (NTAGI) यांनी कोविड-१९ लसीकरण वाढविण्यासाठी निर्देश दिले आहेत.

- तक्ता क्र. १ मधील अ.क्र १ या कोविड लसीकरण केंद्रांच्या ठिकाणी १५ वर्षावरील लाभार्थ्यांकरीता सोबत जोडलेल्या तक्त्यात नमूदनुसार ऑनलाईन तसेच ऑफलाईन पध्दतीने लसीकरण सेवा उपलब्ध राहील.
- तक्ता क्र. १ मधील अ.क्र.२,३,४,५,६,७ व ८ या लसीकरण केंद्राच्या ठिकाणी १५ वर्षावरील शाळेतील विद्यार्थ्यांकरीता कोवॅक्सीन लसीचा पहिल्या डोस करीताचे ऑफलाईन पद्धतीने कोविड लसीकरण सत्र आयोजित करण्यात येत आहे. १५ ते १८ वर्षे वयोगटातील तरुणांच्या लसीकरणासाठी सन २००७ किंवा त्यापूर्वी जन्म वर्ष असलेले लाभार्थी हे कोविड लसीकरणाकरीता पात्र राहतील. तसेच १५ ते १८ वर्षे वयोगटातील तरुणांच्या कोविड-१९ लसीकरणासाठी केवळ कोव्हॅक्सिन लसीचाच वापर करण्यात येईल.
- तक्ता क्र. २ मधील अ.क्र. ३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२० व २१ या लसीकरण केंद्राच्या ठिकाणी १८ वर्षावरील सर्व नागरीकांकरीता कोविशिल्ड व कोव्हॅक्सीन लसीच्या पहिल्या व दुसरा डोस देय राहील. तसेच दुसरा डोस घेऊन ९ महिने अथवा ३९ आठवडे पूर्ण झालेले आरोग्य कर्मचारी(HCW), अग्रभागी काम करणारे(FLW) कर्मचारी तसेच ६० वर्षावरील सहव्याधी (Cormbidity) असलेले नागरीकांकरीता कोविशिल्ड व कोव्हॅक्सीन लसीचा (Precaution Dose) बुस्टर डोस करीताचे ऑफलाईन व ऑनलाईन पद्धतीने कोविड लसीकरण सत्र आयोजित करण्यात येत आहे.
- सोबत जोडलेल्या तक्ता क्र. २ मधील अ.क्र. १ व २ या लसीकरण केंद्राच्या ठिकाणी शिक्षणासाठी परदेशी जाणारे विद्यार्थी, नोकरीकरीता परदेशी जाणाऱ्या व्यक्ती, समुद्री जहाजांवर काम करणारे भारतीय सीफेरर्स तसेच वैद्यकीय उपचाराकरिता परदेशी जाणाऱ्या नागरिक यांचे कोविशिल्ड लसीच्या पहिल्या व दुसऱ्या डोसकरीताचे लसीकरण सत्र आयोजित करण्यात येत आहे.
- तक्ता क्र. १, व २ मध्ये लसीकरणाची वेळ व डोसेस नमुद करण्यात आले आहेत.
- लाभार्थ्यांना कोविन सिस्टिमवर स्वत:च्या मोबाईल नंबरव्दारे लसीकरणासाठी नोंदणी करता येईल. ऑनलाईन पध्दतीने लाभ घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांना दि.१६/०१/२०२२ रोजी संध्याकाळी ७.०० नंतर कोविन पोर्टलवर नोंदणी करता येईल. तसेच ऑफलाईन पध्दतीने लसीकरणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांना लसीकरण सत्राच्या दिवशी लसीकरण केंद्राच्या ठिकाणी (Onsite) जाऊन नोंदणी करण्याची सुविधा सुध्दा उपलब्ध राहील.
- लसीकरण केंद्रांच्या ठिकाणी प्राधान्याने मिरा भाईंदर शहरातील Offline पध्दतीने लसीकरणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांकरीता टोकन वाटप दि.१७/०१/२०२२ रोजी लसीकरण सत्राच्या वेळी केले जाईल.
- महानगरपालिकेच्या कर्मचारी व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नागरिकांनी टोकन वाटप करु नये तसेच कोणत्याही नागरिकांनी टोकन वाटप प्रक्रीयेत हस्तक्षेप करु नये अथवा बोगस टोकन वाटप करु नये.
- तरी मा. श्रीम. ज्योत्सना हसनाळे, महापौर, मिरा भाईंदर महानगरपालिका व मा. श्री. दिलीप ढोले, आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेमार्फत मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, कोरोनाच्या तिसरी लाट तीव्र स्वरुपाची असू शकते, याकरीता कोरोना आजाराच्या संभाव्य तिसऱ्या लाटेची तीव्रता टाळणेकामी १५ ते १८ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांनी तसेच आरोग्य कर्मचारी (HCW), अग्रभागी काम करणरे कर्मचारी (FLW) व ६० वर्षावरील सहव्याधी (Comorbidity) असलेल्या नागरिकांनी Precaution डोस(बुस्टर डोस) करीताचे लसीकरण त्याचबरोबर अध्यापही कोविड लसीकरणा पासून वंचित असलेल्या नागरीकांनी लवकरात लवकर आपले कोविड लसीकरण पूर्ण करुन घ्यावे.
- तसेच लसीकरण केंद्रांच्या ठिकाणी नागरिकांनी मास्क परिधान करुन तसेच सामाजिक अंतर (Social Distance) चे पालन करुन लसीकरण सुलभरित्या होणेस महानगरपालिकेस सहकार्य करावे.


डॉ. अंजली पाटील

कोविड नोडल अधिकारी

मिरा भाईंदर महानगरपालिका

## मिरा भाईंदर महानगरपालिका
## वैद्यकीय विभाग
### तक्ता क्र.01
### 15 वर्षावरील लाभार्थ्यांरीता कोवॅक्सीन लसीच्या डोसकरीताचे लसीकरण सत्र नियोजन - 17.01.2022

| अ.क्र. | कोविड लसीकरण केंद्राचे नाव | पत्ता | वेळ | लसीचा प्रकार | लाभार्थी गट | डोस | ऑनलाईन/ ऑफलाईन | ऑनलाईन डोसेस | ऑफलाईन डोसेस | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पं. भिमसेन जोशी सामान्य रुग्णालय | मॅक्सस मॉल जवळ, १५० फूट रस्ता, भाईंदर (प) | सकाळी १०.०० ते संध्याकाळी ४.०० | कोवॅक्सीन | सन २००७ व सन २००७ च्या आधी जन्म झालेल्या नागरीकांकरीता | पहिला व दुसरा | ऑनलाईन व ऑफलाईन | ४०० | ४०० | ८०० |
| २ | कपोल वाडी हॉल | गीता नगर, फाटक रोड, भाईंदर(पश्चिम) | सकाळी १०.०० ते दुपारी १.०० | | | | | ० | १०० | १०० |
| ३ | माऊंट मेरी स्कुल | बॉम्बे मार्केट, स्टेशन रोड, भाईंदर(पश्चिम) | सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० | | | | | ० | ६६ | २०० |
| ४ | शांतीनगर स्कुल | शांतीनगर, मिरारोड(पूर्व) | सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० | | | | | ० | ७० | ७० |
| ५ | सिमबॉसिस स्कुल | हॉली क्रॉस स्कुल जवळ, मिरारोड(पूर्व) | सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० | कोवॅक्सीन | सन २००७ व सन २००७ च्या आधी जन्म झालेल्या शाळेतील विद्यार्थी | पहिला | ऑफलाईन | ० | ३० | ३० |
| ६ | पेणकरपाडा स्कुल | आरोग्य केंद्राजवळ, पेणकरपाडा | सकाळी १०.०० ते संध्याकाळी ४.०० | | | | | ० | ५०० | ५०० |
| ७ | डॉ. यादव, मांडवीपाडा | मांडवीपाडा, काशिगाव | सकाळी १०.०० ते दुपारी १.०० | | | | | ० | १०० | १०० |
| ८ | गांधीनगर अंगणवाडी | जनतानगर, डोंगरी, काशिगाव | दुपारी २.०० ते संध्याकाळी ४.०० | | | | | ० | ५० | ५० |

* वरील तक्त्यात नमूद अ.क्र. १ या लसीकरण केंद्राच्या ठिकाणी सन २००७ व सन २००७ च्या आधी जन्म झालेल्या नागरीकांकरीता कोवॅक्सीन लसीचा पहिल्या डोस घेऊन २८ दिवस पूर्ण झालेल्या नागरीकांरीता कोव्हॅक्सीन लसीच्या दुसऱ्या डोस करीताचे ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने कोविड लसीकरण सत्र आयोजित करण्यात येत आहे.
* वरील तक्त्यात नमूद ठिकाणी अ.क्र.२,३,४,५,६,७, व ८ या लसीकरण केंद्राच्या ठिकाणी सन २००७ व सन २००७ च्या आधी जन्म झालेल्या शाळेतील विद्यार्थी शाळेतील विद्यार्थ्यांकरीता कोवॅक्सीन लसीचा पहिल्या डोस करीताचे ऑफलाईन पद्धतीने कोविड लसीकरण सत्र आयोजित करण्यात येत आहे.
* कोविड लसीकरण सत्र Online बुकींगकरीता आज दि. १६/०१/२०२२ रोजी कोविन पोर्टल साईटवर संध्याकाळी ७.०० वाजेनंतर प्रसिध्द केले जातील.
* लसीकरण केंद्राच्या ठिकाणी Offline पध्दतीने लसीकरणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांकरीता टोकन वाटप दि.१७/०१/२०२२ रोजी सकाळी १०.०० वा. नंतर केले जाईल.
* मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत कार्यान्वित करण्यात आलेल्या मोफत खाजगी कोविड लसीकरण केंद्रे बंद करण्यात येत आहेत.

**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**वैद्यकीय विभाग**
**लसीकरण सत्र नियोजन - 17.01.2022**
**तक्ता क्र.02**
**18 वर्षावरील नागरिकांकरीता कोविशिल्ड व कोव्हॅक्सीन लसीचा पहिला व दुसरा डोस तसेच HCW, FLW व 60 वर्षावरील सहव्याधी असलेल्या नागरिकांकरीता (Precaution Dose) बुस्टर डोस**

| अ.क्र. | कोविड लसीकरण केंद्राचे नाव | पत्ता | लसीचा प्रकार | एकूण डोसेस | लाभार्थी गट | वेळ | डोस | ऑनलाईन/ ऑफलाईन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाझरेथ हाय स्कुल | मिरा भाईंदर मुख्यालयाच्या मागे, स्टेशन रोड, भाईंदर(पश्चिम) | कोविशिल्ड | ५० | शिक्षणासाठी परदेशी जाणारे विद्यार्थी, नोकरीकरीता परदेशी जाणाऱ्या व्यक्ती, समुद्री जहाजांवर काम करणारे भारतीय सीफेरर्स तसेच वैद्यकीय उपचाराकरिता परदेशी जाणारे नागरिक | सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० | पहिला डोस घेऊन २८ दिवस झाले असल्यास दुसरा डोस | ऑफलाईन |
| २ | हैदरी चौक | वोक्हार्ट हॉस्पिटलच्या पुढे, हैदरी चौक मिरारेड (पू) मीरा रोड हेल्थ पोस्ट | | ५० | | | | |
| ३ | नाझरेथ हाय स्कुल | मिरा भाईंदर मुख्यालयाच्या मागे, स्टेशन रोड, भाईंदर(पश्चिम) | कोविशिल्ड | १००० | आरोग्य कर्मचारी(HCW), अग्रभागी काम करणारे(FLW), १८ वर्षावरील नागरीक तसेच ६० वर्षावरील सहव्याथी (Cormbidity) असलेले नागरीक | सकाळी १०.०० ते संध्याकाळी ४.०० | पहिला व दुसरा तसेच (Precaution Dose)बुस्टर डोस | ऑफलाईन व ऑनलाईन |
| | | | कोव्हॅक्सीन | ३०० | | | | |
| ४ | हैदरी चौक | वोक्हार्ट हॉस्पिटलच्या पुढे, हैदरी चौक मिरारेड (पू) मीरा रोड हेल्थ पोस्ट | कोविशिल्ड | १००० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | ३०० | | | | |

| अ.क्र. | कोविड लसीकरण केंद्राचे नाव | पत्ता | लसीचा प्रकार | एकूण डोसेस | लाभार्थी गट | वेळ | डोस | ऑनलाईन/ ऑफलाईन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | सेंट पॉल हायस्कूल | नित्यानद नगर, सेंट. पॉल स्कूल, | कोविशिल्ड | १००० | आरोग्य कर्मचारी(HCW), अग्रभागी काम करणारे(FLW), १८ वर्षावरील नागरीक तसेच ६० वर्षावरील सहव्याधी (Cormbidity) असलेले नागरीक | सकाळी १०.०० ते संध्याकाळी ४.०० | पहिला व दुसरा तसेच (Precaution Dose)बुस्टर डोस | ऑफलाईन व ऑनलाईन |
| | | | कोव्हॅक्सीन | ३०० | | | | |
| ६ | पं. भिमसेन जोशी सामान्य रुग्णालय | मॅक्सस मॉल जवळ, १५० फूट रस्ता, भाईंदर (प) | कोविशिल्ड | १००० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | ३०० | | | | |
| ७ | भा. इंदिरा गांधी रुग्णालय | पुनम सागर कॉम्पलेक्सच्या जवळ, मिरारोड (पुर्व) | कोविशिल्ड | १००० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | ३०० | | | | |
| ८ | अप्पासाहेब धर्माधिकारी हॉल | सेवेन स्केवेयर शाळे जवळ, दीपक हॉस्पिटल रोड, मीरा रोड (पू) | कोविशिल्ड | १००० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | ३०० | | | | |
| ९ | स्व. मीनाताई ठाकरे हॉल | रामदेव पार्क, मीरा रोड (पू) | कोविशिल्ड | १००० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | ३०० | | | | |
| १० | डेल्टा गार्डन | महाजन वाडी, पेणकरपाडा | कोविशिल्ड | १००० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | ३०० | | | | |

| अ.क्र. | कोविड लसीकरण केंद्राचे नाव | पत्ता | लसीचा प्रकार | एकूण डोसेस | लाभार्थी गट | वेळ | डोस | ऑनलाईन/ ऑफलाईन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | आर २, गोल्डन नेस्ट | गोल्डन नेस्ट, सीसीसी समोर. क्रीडा संकुल, नवीन गोल्डन नेस्ट, | कोविशिल्ड | १००० | आरोग्य कर्मचारी(HCW), अग्रभागी काम करणारे(FLW), १८ वर्षावरील नागरीक तसेच ६० वर्षावरील सहव्याधी (Cormbidity) असलेले नागरीक | सकाळी १०.०० ते संध्याकाळी ४.०० | पहिला व दुसरा तसेच (Precaution Dose)बुस्टर डोस | ऑफलाईन व ऑनलाईन |
| | | | कोव्हॅक्सीन | ३०० | | | | |
| १२ | उत्तन मोठा गांव शाळा | मोठा गांव, उत्तन | कोविशिल्ड | १००० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | ३०० | | | | |
| १३ | मुर्धा आरोग्य केंद्र | मुर्धा नगरपालिका शाळा, उत्तन रोड, भाईंदर (प.) | कोविशिल्ड | १००० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | ३०० | | | | |
| १४ | जे.एच.पोद्दार स्कुल | पोद्दार हायस्कूल, शिवसेना गल्ली, भाईंदर (प.) | कोविशिल्ड | १००० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | ३०० | | | | |
| १५ | फादर जोसेफ स्कूल | फादर जोसेफ स्कूल, कस्तुरी पार्क, भाईंदर (पू) | कोविशिल्ड | १००० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | ३०० | | | | |
| १६ | अभिनव विद्या मंदिर स्कुल | अभिनव विद्या मंदिर शाळा, गोडदेव देव, भाईंदर (पुर्व) | कोविशिल्ड | १००० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | ३०० | | | | |
| १७ | आरबीके ग्लोबल स्कुल | आरबीके ग्लोबल, शालोम हॉस्पीटलच्या मागे, मिरारोड (पुर्व) | कोविशिल्ड | १००० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | ३०० | | | | |

| अ.क्र. | कोविड लसीकरण केंद्राचे नाव | पत्ता | लसीचा प्रकार | एकूण डोसेस | लाभार्थी गट | वेळ | डोस | ऑनलाईन/ ऑफलाईन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८ | पेणकरपाडा आरोग्य केंद्र | पेणकरपाडा नगरपालिका शाळा मीरा रोड ई, पेणकरपाडा आरोग्य चौकी | कोविशिल्ड | १००० | आरोग्य कर्मचारी(HCW), अग्रभागी काम करणारे(FLW), १८ वर्षावरील नागरीक तसेच ६० वर्षावरील सहव्याधी (Cormbidity) असलेले नागरीक | सकाळी १०.०० ते संध्याकाळी ४.०० | पहिला व दुसरा तसेच (Precaution Dose)बुस्टर डोस | ऑफलाईन व ऑनलाईन |
| | | | कोव्हॅक्सीन | ३०० | | | | |
| १९ | सेंट झेवियर्स हायस्कुल | माशाचा पाडा रोड, काशिगांव | कोविशिल्ड | ५०० | | | | |
| २० | गौरव वॅली | हाटकेश, राज एक्जोटिका बिल्डिंग च्या समोर, काशिगाव | कोविशिल्ड | २०० | | | | |
| २१ | काशीगाव आरोग्य केंद्र | काशीगाव म्युनिसिपल स्कूल काशीगाव मार्केट काशीगाव हेल्थ पोस्ट समोर | कोविशिल्ड | ५०० | | | | |
| | | | कोव्हॅक्सीन | १०० | | | | |

* वरिल तक्त्यात अ.क्र. ३,४,५,६,७,८,९,१०, ११, १२,१३,१४,१५,१६, १७,१८,१९,२० व २१ या लसीकरण केंद्राच्या ठिकाणी १८ वर्षावरील सर्व नागरीकांकरीता कोविशिल्ड व कोव्हॅक्सीन लसीच्या पहिल्या व दुसरा डोस देय राहील. तसेच दुसरा डोस घेऊन ९ महिने अथवा ३९ आठवडे पूर्ण झालेले आरोग्य कर्मचारी(HCW), अग्रभागी काम करणारे(FLW) कर्मचारी तसेच ६० वर्षावरील सहव्याथी (Cormbidity) असलेले नागरीकांकरीता कोविशिल्ड व कोव्हॅक्सीन लसीचा (Precaution Dose) बुस्टर डोस करीताचे ऑफलाईन व ऑनलाईन पद्धतीने कोविड लसीकरण सत्र आयोजित करण्यात येत आहे.

* वरिल तक्त्यात अ.क्र. १ व २ या लसीकरण केंद्राच्या ठिकाणी शिक्षणासाठी परदेशी जाणारे विद्यार्थी, नोकरीकरीता परदेशी जाणाऱ्या व्यक्ती, समुद्री जहाजांवर काम करणारे भारतीय सीफेरर्स तसेच वैद्यकीय उपचाराकरिता परदेशी जाणाऱ्या नागरिक यांचे कोविशिल्ड लसीच्या पहिल्या व दुसऱ्या डोसकरीताचे ऑफलाईन पद्धतीने लसीकरण सत्र आयोजित करण्यात येत आहे

* कोविड लसीकरण सत्र Online बुकींगकरीता आज दि. १६/०१/२०२२ रोजी कोविन पोर्टल साईटवर संध्याकाळी ७.०० वाजेनंतर प्रसिध्द केले जातील.

* लसीकरण केंद्राच्या ठिकाणी Offline पध्दतीने लसीकरणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या तरुणांकरीता टोकन वाटप दि.१७/०१/२०२२ रोजी सकाळी १०.०० वा. नंतर केले जाईल.